0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचा :-**

१) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दिनांक ०८/११/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७३/२०१२/जा.७८३, दिनांक ०७/११/२०१२, १६/११/२०१२ व १०/१२/२०१२.

३) मे. सावला फुड्स ॲन्ड कोल्ड स्टोअरेज प्रा. लि. यांचे दिनांक ०८/११/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदने.

४) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांचा दिनांक ०९/११/२०१२ रोजीचा अहवाल.

५) दिनांक १०/११/२०१२ रोजी सुनावणीस उपस्थित साठा मालकांनी सादर केलेली स्वतंत्र लेखी निवेदने.

६) मे. सहकार जनरल स्टोर्स यांचे दिनांक १६/११/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

७) या कार्यालयाचे "आदेश" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७३/२०१२/जा.८४७, दिनांक २९/११/२०१२.

८) या कार्यालयाचे पत्र क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७३/२०१२/जा.८९५, दिनांक १३/१२/२०१२.

९) या कार्यालयाचे पत्र क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७३/२०१२/जा.८९६, दिनांक १३/१२/२०१२.

१०) दिनांक १८/१२/२०१२ रोजी सुनावणीस उपस्थित साठा मालकांनी सादर केलेली स्वतंत्र लेखी निवेदने.

११) जिल्हा पुरवठा अधिकारी, रायगड यांचा दिनांक २१/१२/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७३/२०१२/जा.१७१
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इंशुरस इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : ०४/०३/२०१३.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

## आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक ०२/११/२०१२ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक खबरीनुसार या कार्यालयातील फिरते पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी मे. सावला फुड्स ॲन्ड कोल्ड स्टोअरेज प्रा. लि., डी-३९, टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, एम.आर.डी.सी., तुर्भे, नवी मुंबई ४०० ७०३ या ठिकाणी अचानक भेट देवून उपस्थित व्यक्ती

पुनितचंद लेहनुराम शर्मा यांच्याकडे सदर आस्थापनेमध्ये साठवणुक केलेल्या अन्नधान्य व कडधान्य साठयाबाबत चौकशी केली असता, त्याने सदरचा साठा हा विविध व्यापाऱ्यांचा असल्याचे सांगितले. सदर साठयाच्या साठवणुकीबाबत त्यांच्याकडे आवश्यक त्या कागदपत्रांची व परवान्यांची मागणी केली असता, सदरचे परवाने त्यांच्याकडे नसुन संबंधित साठामालकांकडे असल्याचे सांगितले. उपस्थिताकडे साठवणुक केलेल्या साठयाच्या मालकांबाबत तसेच साठवणुक केलेल्या साठयाबाबत ठेवण्यात आलेल्या नोंदवहयांबाबत विचारणा केली असता, त्यांचेकडे अशा हस्तलिखित नोंदवहया नसुन याबाबत माहिती संगणकात असल्याचे सांगितल्याने अधिकाऱ्यांनी सदर माहितीची प्रत सादर करण्याबाबत संबंधितास सुचना दिली असता, संगणकावरुन विविध व्यापाऱ्यांनी नमूद गोदामात साठवणूक केलेल्या अन्नधान्य व कडधान्याच्या प्रकारानुसार संगणकीय प्रत सादर केली. सदर यादीनुसार सदरच्या गोदामात एकुण १४० साठामालकांचा जीवनावश्यक वस्तुंचा साठा साठवणुक केल्याचे निदर्शनास आले.

सदरच्या १४० साठामालकांकडे जीवनावश्यक वस्तुच्या साठवणुकीबाबत आवश्यक परवाना व साठवणुकी संदर्भात इतर दस्तऐवज संबंधित व्यापाऱ्यांकडे आहेत किंवा कसे ? याबाबतची माहिती गोदाम व्यवस्थापकाने त्याचेकडे उपलब्ध नसल्याचे सांगितल्याने सदर बाबींची तपासणी करण्यासाठी साठवणुक केलेला साठा साठामालकांना वितरण न करता पुढील आदेशापर्यंत जतन करण्याच्या लेखी सुचना दिल्या.

तद्नंतर विविध व्यापाऱ्यांचा नमूद कोल्ड स्टोअरेजमधील साठवणूकीचे तपशिल उपलब्ध न झाल्याने सदरहू व्यापाऱ्यांकडे अन्नधान्य/कडधान्यच्या व्यवसायासाठी आवश्यक असणारे घाऊक अथवा किरकोळ परवाने आहे किंवा कसे ? याबाबत खातरजमा करण्यासाठी मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्राअंतर्गत परिमंडळ निहाय अभिलेख पडताळून पाहिले असता, त्याची विगतवारी खालीलप्रमाणे आढळून आली.

| अ.क्र. | तपशिल | संख्या |
|---|---|---|
| १ | सदर गोदामाची नोंद न केलेले घाऊक परवानाधारक | २५ |
| २ | किरकोळ परवानाधारक | १५ |
| ३ | मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्राबाहेरील साठामालक | १० |
| ४ | परवानाधारक नसलेले साठामालक | ८१ |
| | गोदामात साठा केलेले एकूण साठामालक | १३१ |

उपरोक्त विगतवारीनुसार अनुक्रमांक १ मधील ८ परवानाधारक वगळता उर्वरीत अनुक्रमांक २ ते ५ मधील एकूण १३२ परवानाधारकांच्या अनुज्ञप्तीवर सदर कोल्ड स्टोअरेजची अतिरिक्त गोदाम म्हणून नोंद आहे किंवा कसे? तसेच उर्वरीत साठामालकांकडे आवश्यक असलेला घाऊक अथवा किरकोळ परवान्याबाबत अधिक खातरजमा करण्यासाठी सदरचा तात्पुरत्या स्वरुपात जप्त करण्यात आलेला विविध अन्नधान्य/कडधान्यांचा साठा हा पुढील तपासणीच्या अधिन राहून जप्त करण्याच्या कार्यवाहीसाठी दिनांक ०५/११/२०१२ रोजी या कार्यालयाच्या अधिकाऱ्यांनी पंचांसमवेत भेट देवून गोदाम व्यवस्थापकाने उपलब्ध करुन दिलेल्या यादीनुसार परवाने देण्यात



CONTROLLER OF RATIONING HEAD

0003

आलेल्या व्यापाऱ्यांची यादी पडताळली असता, त्यापैकी ८ व्यापाऱ्यांकडे असलेल्या परवान्यावर मे. सावला फुड्स ॲन्ड कोल्ड स्टोअरेज प्रा. लि. या अतिरीक्त गोदामाची नोंद असल्याचे निदर्शनास आल्याने सदर ८ व्यापाऱ्याचा साठा जागेवरच मुक्त करुन उपस्थित गोदाम व्यवस्थापकाचे ताब्यात देण्यात आला. गोदाम व्यवस्थापकाने सादर केलेल्या संगणकीय यादीतील अनु.क्र. ११८ वरील मे. श्रीजी फुड्स या व्यापाऱ्याचा कडधान्याचा साठा दिनांक ०२/११/२०१२ रोजी रात्री ०८.०० वाजताचे सुमारास वितरीत केल्याचे गोदाम व्यवस्थापकाने सांगितले. त्यामुळे उर्वरीत १३१ साठामालकांचा जप्त करण्यात आलेला कडधान्य व अन्नधान्यांचा साठा उपस्थित गोदाम व्यवस्थापकाच्या सुपुर्द करुन सदर व्यापाऱ्यांचा गोदामात साठवणुक केलेला जीवनावश्यक वस्तुंचा साठा त्यांना वितरण न करता पुढील आदेशापर्यंत जतन करण्यात यावा अशा सुचना देवून पंचांसमक्ष सुपुर्दनामा करण्यात आला. तसेच या १३१ व्यापाऱ्यांचा साठा जप्त करण्यात आलेला आहे त्यांना पुढील आदेश प्राप्त होण्यापूर्वी कोणताही साठा वितरीत केल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचेविरुध्द जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ अंतर्गत कारवाई करण्यात येईल असे अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष गोदाम व्यवस्थापकास सांगितले व गोदामात साठवणुक केलेल्या सर्वच १४० व्यापाऱ्यांच्या नांव व पत्यांची यादी दिनांक ०६/११/२०१२ रोजी या कार्यालयास सादर करण्याबाबत सुचना दिल्यानुसार तशाप्रकारची यादी विहीत मुदतीत सादर करण्यात येईल असे आश्वासन गोदाम व्यवस्थापकाने दिले. अशाप्रकारे खालील १३१ साठामालकांचा साठा नमुद गोदामात जप्त करण्यात आला.

**मे. सावला फुड्स ॲन्ड कोल्ड स्टोअरेज प्रा.लि. या गोदामाची नोंद न केलेले घाऊक परवानाधारकांची यादी**

| अ.क्र. | व्यापाऱ्याचे नांव | जिन्नस | बाचके | एकुण किलोग्रॅम |
|---|---|---|---|---|
| १ | मे. अनमोल एन्टरप्रायजेस | वाल | ४ | १२० |
| | | छोरा | १३ | ६५० |
| २ | मे. भावीनकुमार गांगजी ॲन्ड कं. | मुग व मुगडाळ | ७०० | ३२९२० |
| | | उडीद | ९१ | ३९५० |
| | | वाल | १७० | ६३८० |
| | | चणा | ६६९ | २००७० |
| | | ओएनव्ही | १२ | ५८० |
| ३ | मे. भगवती एन्टरप्रायजेस | वाटाणा | १३ | ६५० |
| | | छोरा | ३४ | १०२० |
| ४ | मे. दिपक पल्सेस | मुग | २०७० | ६९७४० |
| | | मठ | ४०० | १२००० |
| ५ | मे. दिपक ट्रेडींग कंपनी -ठाणे | छोरा | ३१ | ९३० |
| | | मठ | ५ | १५० |
| | | वाल | ३७ | १८५० |
| ६ | मे. दिपक ट्रेडर्स | चणा | ४ | २०० |
| ७ | मे. हरी एन्टरप्रायजेस | कुलथी | १ | ५० |

0004

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | छोरा | १०८ | ३२८० |
| ८ | मे. हितेन ॲन्ड कंपनी | छोरा | २५५ | ७६५० |
| ९ | मे. जशोदा एन्टरप्रायजेस | मुग | ४८ | २४०० |
| | | मठ | २२९ | ६८७० |
| १० | मे. जय ट्रेडींग कंपनी | चणा | २९६ | १२४०० |
| | | वाल | २२५ | ६७५० |
| | | राजमा | ५५ | २७५० |
| | | छोरा | ३३० | ९९०० |
| ११ | मे. किरण कॉर्पोरेशन | मठ | ८६ | २५८० |
| | | छोरा | ३९३ | ११७९० |
| | | मुग | ८१५ | २४४५० |
| १२ | मे. खुशालचंद खिमजी ॲन्ड कं. | वाटाणा | ८९० | ४४५०० |
| | | ओएव्ही | ७० | २१०० |
| १३ | मे. मोहनलाल ॲन्ड कं. | मुग व मुगडाळ | ५५ | १६५० |
| | | उडीद व दाळ | ७० | २४०० |
| | | छोरा | ८६० | २५२०० |
| | | वाल | ३१५ | १५७५० |
| | | मसुर | ४० | २००० |
| १४ | मे. नम्रता एन्टरप्रायझेस | चणा | ७५ | २२५० |
| | | मुग | ३२० | ९६०० |
| १५ | मे. पायल एन्टरप्रायजेस | चणा | ८ | २४० |
| | | मकई | ४ | १२० |
| १६ | मे. पटेल ट्रेडींग कंपनी | वाल | २१ | १०५० |
| | | छोरा | ७ | ३५० |
| १७ | मे. वृषभ ट्रेडींग कंपनी | चणा | २४ | १२०० |
| १८ | मे. शैलेशकुमार ॲन्ड कंपनी | मुग | ३ | १८० |
| १९ | मे. शुभलाभ एन्टरप्रायझेस | ओएनव्ही | ४८ | २४०० |
| २० | मे. शहा नानजी रावजी | मठ | १६८ | ५०४० |
| | | मुग | १०० | ३००० |
| २१ | मे. एस शांतीलाल ॲन्ड कं. | वाल | १०३८ | ३११४० |
| २२ | मे. श्रीजी ट्रेडर्स- ठाणे | वाल | ५४ | १६२० |
| | | मसुर | १ | २५ |
| | | मठ | २६ | ७८० |
| २३ | मे. विक्रम ट्रेडींग कंपनी | चणा | ३९ | १९५० |
| | | वाल | १४ | ७०० |
| २४ | मे. वागड मार्केटींग (रेशनिंग डिपार्टमेंट) | छोरा | १२१ | ५५५० |
| | | मुग | १ | ५० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| [illegible] | [illegible] | वाटाणा | ६ | ३०० |
| २५ | मे. वागड मार्केटींग | चणा | ७ | ३५० |

## किरकोळ परवानाधारकांची यादी

| अ.क्र. | व्यापाऱ्याचे नांव | जिन्नस | बाचके | एकुण किलोग्रॅम |
|---|---|---|---|---|
| १ | मे. अमित स्टोअर्स (कल्याण) | मठ | ९ | ४५० |
| | | मुग | ११ | ५५० |
| २ | मे. अमृत ट्रेडींग कंपनी (अंबरनाथ) | छोरा | ७० | २१०० |
| ३ | मे. छेडा स्टोअर्स (माटूंगा) | तांदुळ | १८२ | ४६५० |
| | | चणा | ३० | ९०० |
| | | छोरा | २० | ६०० |
| | | ओएनव्ही | ३९४ | ११८२० |
| | | मुग व मुगडाळ | ८१४ | २४४२० |
| ४ | मे. डी आर कॉर्पोरेशन | मठ | ५ | १५० |
| | | मुग | ३० | ९०० |
| ५ | मे. जनता स्टोअर्स | कुटीदारो | ७ | १७५ |
| ६ | मे. जाधवजी नरसी- दादर | ओएनव्ही | ४ | २०० |
| | | सॅमो | १८ | ९०० |
| ७ | मे. मेघ सन्स- मालाड | तांदुळ | १३ | ३९० |
| | | मठ | १ | २५ |
| | | ओएनव्ही | ६ | ३०० |
| ८ | मे. प्रेमजी देवजी - कुर्ला | ओएनव्ही | २३ | ६९० |
| ९ | मे. प्रेमजी लालजी- सांताक्रुझ | चणा | २५ | १२५० |
| | | मुग | २०५ | ६१५० |
| १० | मे. पालम पासु ॲन्ड कंपनी | चणा | २३ | ३९० |
| ११ | मे. पोपटलाल प्रेमजी ॲन्ड कं. | मुग | ४ | १२० |
| १२ | मे. पटेल स्टोअर्स - दादर | चणा | ८ | ४०० |
| | | वाल | १० | ५०० |
| | | मुग | १५ | ४५० |
| १३ | मे. सर्वोदय स्टोअर्स प्रा.लि.- दादर | वाल | ५६ | २८०० |
| १४ | मे. शांती दाल मिल | चणा | ७ | ३५० |
| १५ | मे. वसंतलाल कांनजी -दादर | वाल | २ | १०० |
| | | छोरा | ४१ | १२३० |
| | | जव | १४ | ७०० |
| | | मुग | २० | ६०० |
| | | चणा | ४ | १२० |

## मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रांबाहेरील साठामालकांची यादी

| अ.क्र. | व्यापाऱ्याचे नांव | जिन्नस | बाचके | एकुण किलोग्रॅम |
|---|---|---|---|---|
| १ | मे. अतुल ट्रडर्स (पनवेल) | राजमा | ७६ | ३८०० |
| | | छोरा | ९५ | २६२५ |
| | | चणा | ५५ | १६५० |
| २ | मे. देढीया ट्रेडींग कंपनी - वसई | वाल | ३ | १५० |
| ३ | मे. हिरजी मोनजी ॲन्ड कं. - पनवेल | वाल | १६ | ४८० |
| ४ | मे. हर्षिता एन्टरप्रायजेस- विरार | मुग | १५ | ४५० |
| ५ | मे. लिलाधर भगवानदास -पेण | चणा | ४ | १२० |
| | | मुग | ३० | ९०० |
| | | छोरा | २३ | ६९० |
| ६ | मे. महालक्ष्मी प्रोव्हीजन स्टोअर्स - विरार | छोरा | ५ | १५० |
| | | मुग | २४ | ७२० |
| ७ | मे. माय शॉप - अलीबाग | छोरा | १५० | ४५०० |
| ८ | मे. परेश ट्रेडींग - पनवेल | चणा | २५ | ७५० |
| | | छोरा | ३५ | १०५० |
| ९ | मे. सहकार जनरल स्टोअर्स - बोळीज | मुग | ३२ | ९६० |
| | | छोरा | ३ | ९० |
| १० | मे. वर्धमान ट्रेडींग कंपनी - वसई | मुग | ६० | ३००० |
| | | चणा | ९० | २७०० |

## परवानाधारक नसलेले साठामालकांची यादी

| अ.क्र. | व्यापाऱ्यांचे नांव | जिन्नस | बाचके | एकुण किलोग्रॅम |
|---|---|---|---|---|
| १ | मे. अंकुर ड्रायफुट | छोरा (चवळी) | ३ | ९० |
| | | चणा | २१ | १०५० |
| | | वाल | २१ | ५२५ |
| | | का. चणा | ५ | १५० |
| | | मुग | ९८ | २९४० |
| २ | मे. अरविंद स्टोअर्स (मालाड) | मुग | ६० | १८०० |
| ३ | मे. बी ए पी एस स्वामीनारायण संस्था | वाटाणा | ४ | १७५ |
| ४ | मे. बहुचारीज ट्रेडींग कंपनी (माथाडी भवन) | छोरा | २ | ६० |
| ५ | मे. भावेश ॲन्ड कंपनी | मसुर | ३७ | १८५० |
| | | राजमा | १८९ | ६३०० |
| | | वाल | ४३० | २१५०० |
| | | तुर | २०० | १०००० |

0007

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | मठ | १७० | ८५०० |
| | | छोरा | ४९ | २४५० |
| | | चणा | ८० | ४००० |
| | | वाटाणा | ७९ | ३४५० |
| | | मुग | ११३ | ३५९० |
| | | सामो | ३० | १५०० |
| ६ | मे. छेडा दालमिल (अंधेरी) | मुग | १५ | ७५० |
| ७ | मे. चेतना ड्रायफुट ॲन्ड सन्स | मुग | ११५ | ५७५० |
| ८ | मे. छेडा ग्रेन ॲन्ड जनरल स्टोअर्स | मुग | १० | ५०० |
| | | राईस | १० | ५०० |
| | | वाटाणा | १६ | ८०० |
| | | वाल | १०५ | ३१५० |
| ९ | मे. छेडा बिस्किट मार्ट | वाल | १५ | ४५० |
| १० | मे. छेडा मार्केटींग | मुग | २ | ६० |
| ११ | मे. दिनेशकुमार गांगजी- खार | छोरा | ६८ | २७४० |
| | | मठ | २ | १०० |
| | | वाटाणा | ५० | १८२० |
| | | मुग | १४ | ४२० |
| | | वाल | १३ | ३९० |
| १२ | मे. डी पी मेवावाला | छोरा | ३ | ९० |
| १३ | मे. डी बेन्सीमल ॲन्ड सन्स | कुटीदारा | ५ | १५० |
| | | जव | ८ | ४०० |
| १४ | मे. इडन जनरल स्टोअर्स | मठ | ३ | ९० |
| १५ | मे. घेलानी स्टोअर्स- घाटकोपर | मुग | ६ | ३०० |
| | | ओएनव्ही | ८० | ४००० |
| १६ | मे. गांगर ट्रेडींग कंपनी | चणा | २३ | ६९० |
| | | मुग | ७१४ | २१४२० |
| | | छोरा | ९० | २७०० |
| १७ | मे. गाला ट्रेडींग कंपनी- परेल | छोरा | ३४ | १०२० |
| १८ | मे. हितेंद्र ब्रदर्स | तांदुळ | १ | २५ |
| | | ओएनव्ही | २ | ५० |
| १९ | मे. एच एल ट्रेडींग कंपनी | छोरा | २८९ | १२०५० |
| | | चणा | ५०१ | १८०१० |
| | | मुग | ४९ | १४७० |
| २० | मे. हंसराज भारमल- परेल | वाटाणा | १० | ५०० |
| २१ | मे. हरकचंद राघवजी - मालाड | वाटाणा | १५ | ७५० |
| | | ओएनव्ही | ४५ | २२५० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | मठ | ७ | २१० |
| | | मुग | ९५ | २८५० |
| २२ | मे. इंडीयन ड्रायफ्रुट ट्रेडर्स | ओएव्ही | १० | ३२० |
| | | तांदुळ | १ | २५ |
| २३ | मे. इंदरमल फतेचंद | छोरा | ३ | ९० |
| | | मुग | ३५ | १०५० |
| २४ | मे. जैन ॲन्ड अय्यर | उडीद दाळ | ३५ | १७५० |
| | | तांदुळ | २० | १००० |
| २५ | मे. ज्योती स्टोअर्स - लालबाग | कुलथी | ४ | २०० |
| २६ | मे. कल्याणजी देराज ॲन्ड कंपनी | मुग | ५३ | १५९० |
| | | वाल | १० | ३०० |
| २७ | मे. कारीया ग्रेन स्टोअर्स | वाल | ५ | २५० |
| २८ | मे. कानजी प्रेमजी - मालाड | जंव | ५ | २५० |
| २९ | मे. के. किशोर ॲन्ड कं. | मुग | २४ | ४४० |
| | | छोरा | ५ | १५० |
| ३० | मे. किरण स्टोअर्स- मालाड | मुग | ७८ | २२९० |
| ३१ | मे. लिलास फुडस् इंम्पेक्स प्रा.लि. | चणा | २ | ६० |
| | | छोरा | ३९ | ११७० |
| ३२ | मे.लक्ष्मी एन्टरप्रायझेस- कल्याण | मठ | ५ | १५० |
| | | वाल | ३० | १४०० |
| ३३ | मे. लखमशी नागशी ॲन्ड कं.- परेल | वाटाणा | ५ | २५० |
| | | चणा | ६ | १८० |
| ३४ | मे. लाधुबाई थोबाने- घाटकोपर | मुग | ९ | ४५० |
| ३५ | मे. महावीर ट्रेडींग | मंठ | १२ | ३६० |
| | | राजमा | १४ | ७०० |
| ३६ | मे. मनीषा ट्रडींग | चणा | १३ | ६५० |
| ३७ | मे. मेहुल ट्रेडींग कंपनी | चणा | ३८ | ११४० |
| ३८ | मे. महावीर ट्रेडींग कंपनी- कळवा | वाल | १३ | ६५० |
| ३९ | मे. मिलन ब्रदर्स | छोरा | १७ | ५७० |
| | | चणा | ६ | १८० |
| | | वाटाणा | ६ | ३०० |
| | | ओएव्ही | १८ | ९०० |
| | | मकई | १५ | ७५० |
| | | जव | २६ | ७८० |
| ४० | मे. मुरजी जेठाभाई ॲन्ड कंपनी | वाल | ७ | ३५० |
| | | चणा | ७ | २१० |
| | | मुग | ८ | २४० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | छोरा | ५ | १५० |
| | | मसुर | २ | ६० |
| ४१ | मे. महालक्ष्मी किराणा स्टोअर्स | वाल | २३ | ८३० |
| | | छोरा | ९५ | ४११० |
| ४२ | मे. मित्रेश मसाला | मुग | ५ | १५० |
| | | छोरा | ८ | २४० |
| | | मठ | १५ | ४५० |
| | | वाल | २ | ६० |
| ४३ | मे. महेश मसाला - भांडुप | मठ | ८० | २४०० |
| | | मुग | ५८ | १७४० |
| ४४ | मे. मित्रेश मार्केटींग | मुग | ५४ | १६२० |
| ४५ | मे. मंगलम ड्रायफ्रुट | छोरा | २४ | ७२० |
| ४६ | मे. मेघदुत सुपरमार्केट | छोरा | ८ | ४०० |
| | | चणा | ११ | ३३० |
| ४७ | मे. मिलाप ट्रेडर्स | कुटीदारो | २ | ५० |
| ४८ | मे. नविनचंद्र चिमनलाल | मठ | २४ | ७२० |
| ४९ | मे. न्यु गणेश ट्रेडींग कंपनी | मठ | १६ | ४८० |
| | | कुलथी | १० | ५०० |
| ५० | मे. निकुंज मसाला- घाटकोपर | मठ | १६ | ४८० |
| ५१ | मे. नंदकिशोर मगनलाल ॲन्ड कं. | राजमा | २ | १०० |
| ५२ | मे. नानुमल जेसुमल | मुग | १७ | ५१० |
| ५३ | मे. नवनीश स्टोअर्स- परेल | छोरा | ४६ | १३८० |
| | | तांदुळ | ५ | १२५ |
| | | वाल | १६ | ४८० |
| | | मुग | १८ | ५४० |
| ५४ | मे. न्यु पटेल ट्रेडर्स | कुटीदारा | २ | ५० |
| | | छोरा | १८ | ९०० |
| | | चणा | १ | ५० |
| ५५ | मे. नाथुभाई शिवजी | वाल | ५ | २५० |
| | | चणा | ५ | १९० |
| | | छोरा | १९ | ५७० |
| | | मुग | २७ | ८२० |
| ५६ | मे. न्यु ठक्कर स्टोअर्स | कुटीदारो | ५ | १२५ |
| ५७ | मे. नविनचंद्र गोगरी | ओएनव्ही | २ | १०० |
| ५८ | मे. ओमकार ट्रेडींग ॲन्ड कं. | छोरा | ६९० | २०७०० |
| ५९ | मे. पारस ग्रेन स्टोअर्स | मसुर | ८ | ४०० |
| | | वाटाणा | ११ | ३३० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | चणा | १३ | ६५० |
| | | छोरा | १६ | ४८० |
| | | मुग | ३० | ९०० |
| ६० | मे. प्रेम शंकर महाराज | तुर | २ | ५५ |
| | | राईस | १ | ५० |
| ६१ | मे. पुजा ट्रेडींग कंपनी- गोरेगांव | छोरा | २५ | ७५० |
| | | मुग | ३० | ९०० |
| ६२ | मे. रमेश ट्रेडींग कंपनी | छोरा | ७ | ३५० |
| ६३ | मे. रमनलाल विठ्ठलदास ॲन्ड कं. | तांदुळ | ८ | २०० |
| ६४ | मे. राजेंद्रकुमार बाबुलाल खाबीया | वाल | ८२ | ३१०० |
| ६५ | मे. राजेश जनरल स्टोअर्स | वाटाणा | ३ | १५० |
| | | तांदुळ | १० | ३०० |
| | | मठ | ५ | १५० |
| | | तुरडाळ | १० | २५० |
| ६६ | मे. राजकमल स्टोअर्स | छोरा | ३० | ९०० |
| ६७ | मे. सफल ट्रेडर्स | छोरा | २८ | ८४० |
| | | मुग | २८ | ८४० |
| ६८ | मे. श्रीचामुंडेश्वरी ट्रेडर्स | सॅमो | १ | ३० |
| | | तांदुळ | १ | ५० |
| | | कुटीदारो | १३ | ३२५ |
| ६९ | मे. श्री एन्टरप्रायजेस | तांदुळ | ९०९ | २२७२५ |
| ७० | मे. श्री मेघराज मार्केटींग | छोरा | ८ | ४०० |
| | | वाटाणा | ३१ | १५५० |
| ७१ | मे. श्रीहरी स्पाईसेस | वाल | ८ | १४० |
| ७२ | मे. शंकर ट्रेडींग कंपनी | छोरा | ३ | ९० |
| ७३ | मे. सुनिल एच जैन | उडीद दाळ | १५ | ७५० |
| ७४ | मे. श्रीप्रसाद फराळी भांडार | कुटीदारो | २५ | ६२५ |
| ७५ | मे. श्रीराम ट्रेडर्स | कुटीदारो | १७ | ४२५ |
| ७६ | मे. सत्यनारायण प्रोव्हीजन स्टोअर्स | मुग | ८७ | २६१० |
| ७७ | मे. उपेटवाला ट्रेडींग कंपनी | छोरा | २८ | १४०० |
| ७८ | मे. विकमणी ब्रदर्स | छोरा | ५ | १५० |
| ७९ | मे. वेराई मसाला- अंधेरी | छोरा | १२ | ३६० |
| ८० | मे. वसंतजी सावला | ओएव्ही | १३ | ३५० |
| ८१ | मे . विपुल ट्रेडींग कंपनी | छोरा | ९ | २७० |
| | | मुग | ६ | १८० |

CONTROLLER OF RATIONING & ... HEAD ... MUMBAI

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमल), मुंबई यांनी वाचावे क्र. १ अन्वये केलेली असून जीवनावश्यक वस्तुंमधील अन्नधान्य/कडधान्यांचा साठा शासनजमा का करण्यात येवू नये ? याबाबत वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली. सदरचा जप्त अन्नधान्य/कडधान्यांचा साठा हा नाशवंत असल्याने, त्याकरीता या कार्यालयात दिनांक १०/११/२०१२, ०५/१२/२०१२ व १८/१२/२०१२ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक १०/११/२०१२ रोजीच्या सुनावणीस ज्या साठामालकांचे प्राधिकृत प्रतिनिधी अथवा साठामालक हे स्वत: उपस्थित राहिले त्यांना त्यांचे लेखी अथवा मौखीक म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली. सदर सुनावणीस जे साठामालक स्वत: अथवा त्यांचे वतीने प्राधिकृत प्रतिनिधी अनुपस्थित राहिले सदरच्या साठामालकांना त्यांचे लेखी अथवा मौखिक म्हणणे मांडण्यासाठी या कार्यालयात दिनांक ०५/१२/२०१२ रोजी ठेवण्यात आली. उपरोक्त उपस्थितांपैकी काही साठा मालक हे मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्राच्या बाहेरील असल्याने व सदर साठा मालकांकडे घाऊक अथवा किरकोळ परवाना नसल्याचे सांगितल्याने सदर साठा मालकांच्या बाबतीत संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी यांचेकडून अहवाल प्राप्त करुन घेण्यासाठी पत्र निर्गमित करण्यात आले.

तत्पुर्वी दिनांक १०/११/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित राहिलेल्या साठा मालकांनी त्यांचे लेखी निवेदने सादर केले असल्याने त्यांच्यापैकी अहवाल अप्राप्त असलेल्या साठामालकांव्यतिरीक्त इतर साठामालकांच्या साठयाबाबत या कार्यालयाचे दिनांक २९/११/२०१२ रोजीच्या आदेशान्वये विल्हेवाटीचे आदेश पारित करण्यात आलेले आहेत.

दिनांक ०५/१२/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. जशोदा एन्टरप्राझेसचे मालक दिपक शंभूलाल गोरी, मे. जय ट्रेडिंग कंपनीचे मालक दिपक शंभूलाल गोरी, मे. अमित स्टोअर्सचे मालक जसवंती महेंद्र शहा, मे. वागड मार्केटिंगचे मालक मणिलाल आसदिर गाला, मे. रमेश ट्रेडिंग कंपनीचे मालक दामजी लक्ष्मण पटेल, मे. शांती दालमिलचे मालक प्रफुल मालसी गडा, मे. नंदकिशोर मगनलाल आणि कंपनीचे मालक किर्ती बृजलाल पंड्या, मे. सफल ट्रेडर्सचे व्यवस्थापक दिनेश नागजीभाई गडा, मे. पुजा ट्रेडिंगचे मालक किरीट विसनजी मामनीया, मे. अनमोल एन्टरप्राईसचे मालक माणजी करपन पटेल, मे पायल एन्टरप्राईसचे विनोद भानजी शहा, मे. उपेटवाला ट्रेडिंग कंपनीचे व्यवस्थापक नाथानी सिध्दीक मोहम्मद, मे रमणलाल विठ्ठलदास ॲन्ड कंपनीचे प्रतिनिधी अरविंद प्रतापराम संघवी, मे. मित्रेश मसालाचे मालक रुपलभाई लक्ष्मीकांत राणा, मे. महावीर ट्रेडिंग कंपनीचे मालक तेजस दामजी शहा, मे. हंसराज भारमल (परेल) च्या मालकाचा मुलगा धिरेन नेमचंद सावला, मे. नवनित स्टोअर्सचे मालक प्रेमजी दामजी गोसर, मे. अरविंद स्टोअर्सचे मालक गोविंदभाई भोजाभाई पटेल, मे. दिपक ट्रेडर्स (वाशी) चे मालक दिपक इश्वरलाल राजगोर, मे. वेराई मसालाचे मालक हितेश ताराचंद जोशी, मे. सत्यनारायण प्रोव्हिजनचे

मालक दयालदास पिजूमल गोपलानी, मे. भगवती एन्टरप्रायझेसचे मालक रमेश अबाची गामी, मे. पोपटलाल प्रेमजीचे भागीदार दिलीप प्रेमजी वोरा, मे. चेतना ड्रायफ्रुट ॲन्ड सन्स ट्रस्टचे सदस्य हेमंत मुळचंद गोसर, मे. मुरजी जेठाभाईचे मालक आजदिर जेठालाल फरिया, मे. शंकर ट्रेडिंगचे मालक महेश खिमजी गजरा, मे. मंगलम ड्रायफ्रुटचे मालक किशोर अर्जुन शहा, मे. चामुंडेश्वरी ट्रेडर्सचे व्यवस्थापक महेश शोभराज शर्मा, मे. लखमशी नागशीचे मालक रसिकलाल लखमशी संघोई, मे. न्यु पटेल ट्रेडर्सच्या मालकाचा मुलगा अशोक कानजी भानुशाली, मे. मिलन ब्रदर्सचे भागीदार हरिलाल खिमजी शहा, मे. मनिषा ट्रेडिंगचे मालक रतनशी गोविंद पटेल, मे. विपूल ट्रेडिंग कंपनीचे मालक आनंद भिमा रावडिया, मे हर्षिता एन्टरप्रायझेसचे मालक आनंद लक्ष्मीलाल शहा व मे. दिपक ट्रेडिंग कंपनीचे मालक डुंगरशी हरखा गाला या साठामालकांचे प्राधिकृत प्रतिनिधी अथवा साठामालक हे उपस्थित राहिले. उर्वरीत अनुपस्थित असलेल्या साठा मालकांना त्यांचे लेखी अथवा मौखिक म्हणणे मांडण्यासाठी या कार्यालयात दिनांक १८/१२/२०१२ रोजी अंतीम सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक १८/१२/२०१२ रोजीच्या अंतीम सुनावणीस मे. हरि एन्टरप्रायझेसचे भागीदार मोहन बुदीया मंगे, मे. शैलेशकुमार आणि कंपनीचे मालक निकी भोगीलाल गोगरी, मे. छेडा मार्केटिंगचे मालक रसिक उमरशी छेडा, मे. डी.पी. मेवावालाचे मालक अशोक पेराझ गोरी व मे. नानूमल जेसूमलचे मालक नंद नानूमल आहुजा या साठामालकांचे प्राधिकृत प्रतिनिधी अथवा साठामालक व मे. सावला कोल्ड स्टोरेजचे व्यवस्थापक पुनितचंद लेनू शर्मा हे उपस्थित राहिले. सदर अंतीम सुनावणीसही मे. बहुचारिस ट्रेडिंग कंपनीच्या वतीने कोणीही उपस्थित राहिले नाहीत.

तद्नंतर जिल्हा पुरवठा अधिकारी यांचा वाचावे क्र. ११ अन्वये त्यांच्या कार्यक्षेत्रातील साठामालकांबाबतचा परिपूर्ण अहवाल प्राप्त झालेला आहे.

सबब, सदरचे प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखून ठेवण्यात आले.

<u>युक्तिवाद :-</u>

उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी सादर केलेल्या अहवालात, त्यांच्या कार्यक्षेत्रातील जप्त साठ्याचे साठामालकांकडे महाराष्ट्र शेडयुल्ड कमोडीटीज होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर, १९९८ अन्वये अन्नधान्य/कडधान्याच्या घाऊक व्यापाराकरिता आवश्यक असलेल्या परवाना साठा मालकांनी धारण केला आहे किंवा कसे ? असल्यास त्याचे तपशिल, परवानाधारकाचा पत्ता, परवानावरील वेगळे गोदाम नमूद आहे किंवा कसे ? असल्यास त्याचा तपशिल व नसल्यास जप्त करण्यात आलेल्या गोदामात साठा मालकांनी साठवणूक केल्याबाबतचे सुचनापत्र दिले आहे किंवा कसे ? तसेच परवाना असल्यास त्याची वैधता याबाबतचा साठामालक निहाय परिपूर्ण अहवाल सादर केला आहे.



CONTROLLER OF RATIONING ... HEAD ... MU

दिनांक ०५/१२/२०१२ व १८/१२/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित विविध आस्थापनांच्या साठामालकांनी साठ्याच्या पुराव्यादाखल त्यांच्याकडे उपलब्ध असलेले पुरावादर्शक कागदपत्रे म्हणून घाऊक अथवा किरकोळ परवानाची छायांकित प्रत, जप्त साठ्याची खरेदी बिले, इतर प्राधिकरणाकडील त्यांच्या व्यवसायाकरिता आवश्यक परवाने तसेच या व्यतिरीक्त इतर कागदपत्रांच्या छायांकित प्रती यापैकी उपलब्धतेनुसार कागदपत्रे सादर करुन त्यांचा जप्त असलेला साठा मुक्त करण्याची विनंती केली.

निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन यापुर्वी पारीत केलेल्या आदेशामधील साठामालकांव्यतिरीक्त उर्वरीत साठामालकांच्या जप्त साठयाबाबत मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक ०२/११/२०१२ रोजी या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचांसह मे. सावला फुड्स ॲन्ड कोल्ड स्टोअरेज प्रा. लि., डी-३९, टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, एम.आर.डी.सी., तुर्भे, नवी मुंबई ४०० ७०३ या ठिकाणी धाड टाकून घेण्यात आलेल्या तपासणीमध्ये विविध अन्नधान्य व कडधान्यांचा साठा हा साठवणूकीच्या आवश्यक कागदपत्र व परवान्याशिवाय आढळून आल्याने अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष सदरचा साठा पुढील तपासणीच्या अधिन राहून जप्त करुन मे. सावला फुड्स ॲन्ड कोल्ड स्टोअरेज प्रा. लि. चे व्यवस्थापक यांचेकडे सुपूर्द करण्यात आला व सदरचा साठा पुढील आदेशापर्यंत जतन करण्याच्या सुचना देण्यात आल्या.

केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२३२० (ई), दिनांक २७/०९/२०१२ अन्वये डाळी/कडधान्य, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या अनुसुचित वस्तूंवर दिनांक ३०/०९/२०१३ पर्यंत निर्बंध आहेत. तसेच केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२७१६ (अ), दिनांक २९ नोव्हेंबर, २०११ अन्वये तांदुळ या अनुसुचित वस्तूवर दिनांक ३०/११/२०१२ पर्यंत निर्बंध होते व तद्नंतर अधिसुचना क्र एस.ओ.२९६८ (ई), दिनांक २० डिसेंबर, २०१२ अन्वये दिनांक ३०/११/२०१३ पर्यंत निर्बंध आहेत.

शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००८/६२२/प्र.क्र.२८४/ना.पु.२३ दिनांक ९ मे, २००८ अन्वये शासनाने लागु केलेल्या साठामर्यादेच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाही संदर्भातील मार्गदर्शक सुचनांमध्ये केंद्रशासनाने डाळी, तांदुळ, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या साठयावर निर्बंध आणलेले आहेत. त्यामुळे या वस्तुंचा व्यापार करण्यासाठी घाऊक अथवा किरकोळ परवाना घेणे आवश्यक आहे. तसेच शासन परिपत्रक क्र. ईसीए-१०१०/४९५/प्र.क्र.९४/ना.पु.२३ दिनांक २० मे, २०१० अन्वये केंद्र शासनाने तांदुळ, धान, डाळी, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या साठामर्यादेवर निर्बंध लागु केले आहेत. सबब, या वस्तुंचा व्यापार व साठवणुक करण्याकरीता संबंधित अनुज्ञप्ती

प्राधिकाऱ्याकडून परवाना घेणे आवश्यक आहे. या वस्तुंच्या आयातदारांना साठामर्यादेतुन सुट देण्यात आलेली आहे. परंतु खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या निर्यातदारांना परवाना घेणे आवश्यक आहे. म्हणजेच डाळी/कडधान्य तसेच अन्नधान्य, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या अनुसुचित वस्तुंचा व्यापार करणारे घाऊक व्यापारी व निर्यातदार यांना सदर अनुसुचित वस्तुंच्या खरेदी, साठवणूक व विक्री करीता महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९९८ अन्वये घाऊक परवाना घेण्याची आवश्यकता असुन सदर अनुसुचित वस्तुंचे व्यापार करणारे किरकोळ व्यापाऱ्यांना दि महाराष्ट्र अनुसुचित वस्तू किरकोळ व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९७९ अन्वये किरकोळ परवाना घेणे आवश्यक आहे.

केंद्र शासनाची अधिसुचना क्र एस.ओ. ८८०(ई), दिनांक ३० मार्च २००९ अन्वये दिनांक ०१/०४/२००९ पासुन गव्हावरील निर्बंध काढण्यात आले असल्याने गहु चा व्यापार करणारे घाऊक अथवा किरकोळ व्यापाऱ्यांना गव्हाच्या व्यवसायासाठी परवाना घेण्याची गरज नाही. तसेच महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९९८ व दि महाराष्ट्र अनुसुचित वस्तू किरकोळ व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९७९ मधील नमुद अनुसुचित वस्तुंच्या परिशिष्ट मध्ये कडधान्यांच्या यादीत वाल, मठ, कुटीदारो, कुलथी व सॅमो हे समाविष्ट नसल्याने सदर वस्तुंच्या व्यापाऱ्यांनाही नमुद आदेशान्वये परवाना घेण्याची गरज नाही.

महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९९८ अन्वये देण्यात येणाऱ्या घाऊक परवानामधील "अट क्रमांक २(अ) नुसार अनुज्ञप्तीधारक उपरोक्त व्यवसाय परवानामधील नमुद जागेत व्यवसाय करण्याबाबत" सुचित केले असुन, अट क्रमांक २(ब) नुसार "अनुज्ञप्तीधारक ज्याला उपरोक्त धंदा चालवावयाचा आहे. अनुसुचित वस्तुचा परवानामध्ये उल्लेखिलेल्या गोदामांव्यतिरीक्त इतर कोणत्याही ठिकाणी साठवणुक न करण्याबाबत" नमुद आहे. तसेच "अनुज्ञप्तीधारकाला नमुद केलेल्या ठिकाणाशिवाय इतर ठिकाणी त्याला अनुसुचित वस्तुंचा साठा ठेवण्याची इच्छा असल्यास त्याने त्याबाबत प्रत्यक्ष असे गोदाम कब्जात घेतल्यापासुन ४८ तासात कळविले पाहीजे व अनुज्ञप्ती, बदल करण्यासाठी, अनुज्ञप्ती प्राधिकरणाला सादर केली पाहिजे " असे स्पष्ट नमुद केले आहे.

मे. जशोदा एन्टरप्रायजेस, मे. जय ट्रेडींग कंपनी व मे. शैलेशकुमार ॲन्ड कंपनी या सर्व आस्थापनांच्या मालकांनी सुनावणीच्यावेळी केलेल्या खुलाशात, त्यांचा नमूद वेअरहाऊसमध्ये विविध अन्नधान्य/कडधान्याच्या साठयाची साठवणुक केले असल्याचे सांगितले. उपरोक्त साठामालकांनी निवेदनासोबत सादर केलेल्या पुरावादर्शक कागदपत्रांच्या छायांकित प्रतींचे अवलोकन करता, त्यांनी महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९९८ अन्वये घाऊक परवाने व इतर विविध परवाने धारण केले असुन या व्यतिरीक्त जप्त साठ्याची खरेदी बिले सादर केली आहेत. अनुज्ञप्तीमधील अटीनुसार "अनुज्ञप्तीधारकाला नमुद केलेल्या ठिकाणाशिवाय इतर ठिकाणी त्याला अनुसुचित वस्तुंचा साठा ठेवण्याची इच्छा असल्यास त्याने त्याबाबत प्रत्यक्ष असे गोदाम कब्जात



CONTROLLER OF RATIONING HEAD MUM

घेतल्यापासुन ४८ तासांत कळविणे बंधनकारक आहे." त्या अनुषंगाने सदर साठामालकांनी त्यांच्याकडील घाऊक परवान्यांवर मे. सावला फुड्स ॲन्ड कोल्ड स्टोअरेज प्रा. लि. हे अतिरीक्त गोदाम म्हणुन नोंद असल्याचे अथवा कायमस्वरुपी अतिरीक्त गोदाम नोंदीकरीता अर्ज अथवा सुचनापत्र सादर केल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. सबब, उपरोक्त साठा मालकांनी त्यांना देण्यात आलेल्या परवान्यांमधील अटीं/शर्तींचे पालन करुन त्यांचा खरेदी केलेला विविध अन्नधान्य/कडधान्याचा साठा हा अवैध साठवणुकीच्या उद्देशाने साठवणुक केल्याचे दिसुन येत नसल्याने उपरोक्त सर्व साठामालकांचा जप्त करण्यात आलेला संपुर्ण साठा त्यांना परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

दि महाराष्ट्र अनुसुचित वस्तू किरकोळ व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९७९ अन्वये अनुसुचित वस्तूंचा व्यापार करणाऱ्या किरकोळ व्यापाऱ्यांना किरकोळ परवाना घेणे आवश्यक आहे. सदर आदेशान्वये अन्नधान्य, डाळी/कडधान्य, खाद्यतेल या अनुसुचित वस्तूंचे किरकोळ व्यापारी हे विविध प्रकारचे अन्नधान्य विक्रीकरिता एकत्रितरित्या महानगरपालिकेच्या क्षेत्रात १०० क्विंटल व त्याव्यतिरिक्त इतर क्षेत्रात ५० क्विंटल पेक्षा जास्त साठवणूक करीत असल्यास तसेच विविध प्रकारच्या डाळी/कडधान्य विक्रीकरिता एकत्रितरित्या ५० क्विंटल पेक्षा जास्त साठवणूक करीत असल्यास त्यांना किरकोळ परवाना घेणे आवश्यक आहे.

मे. अनमोल एन्टरप्रायजेस, मे. भगवती एन्टरप्रायजेस, मे. हर्षिता एन्टरप्रायजेस- विरार, मे. लिलाधर भगवानदास, मे. परेश ट्रेडींग- पनवेल, मे. सहकार जनरल स्टोअर्स- बोळींज, मे. अरविंद स्टोअर्स, मे. बहुचारीज ट्रेडींग कंपनी, मे. छेडा दालमिल, मे. छेडा मार्केटींग, मे. डी. पी. मेवावाला, मे. हंसराज भारमल- परेल, मे. इंदरमल फतेचंद, मे. कल्याणजी देराज ॲन्ड कंपनी, मे. लखमशी नागशी ॲन्ड कं. -परेल, मे. महावीर ट्रडींग, मे. मनीषा ट्रेडींग, मे. नंदकिशोर मगनलाल ॲन्ड कं., मे. नानुमल जेसुमल, मे. नवनीत स्टोअर्स- परेल, मे. न्यु पटेल ट्रेडर्स, मे. पुजा ट्रेडींग कंपनी- गोरेगांव, मे. रमनलाल विठ्ठलदास ॲन्ड कं., मे. राजेश जनरल स्टोअर्स, मे. सफल ट्रेडर्स, मे. श्रीचामुंडेश्वरी ट्रेडर्स, मे. सत्यनारायण प्रोव्हीजन स्टोअर्स, मे. विकमणी ब्रदर्स, मे. वेराई मसाला व मे. विपुल ट्रेडींग कंपनी या साठामालकांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात ते अन्नधान्य/कडधान्याचे किरकोळ व्यापारी असुन त्यांच्या दुकानात विक्रीसाठी साठवणुक करीत असलेले विविध अन्नधान्य व कडधान्यांचा साठा हा विहीत मर्यादेच्या आत असल्याने त्यांना किरकोळ परवान्याची गरज नसल्याचे सांगितले आहे. सदर साठामालकांनी त्यांचा साठा मे. सावला फुड्स ॲन्ड कोल्ड स्टोअरेज प्रा. लि. येथे साठयाची पत राखण्यासाठी साठवणुक केल्याचे सांगुन त्यांच्या आवश्यकतेनुसार साठवणुक केलेला साठा हा विक्रीसाठी त्यांच्या दुकानात घेऊन जात असल्याचे सांगितले. सदर साठा मालकांपैकी काही साठा मालकांचा जप्त असलेला साठा हा अनुसुचित वस्तुंच्या यादीत समाविष्ट नसलेला तसेच इतर साठा मालकांचा अन्नधान्य/कडधान्याचा साठा हा विहीत मर्यादेपेक्षा कमी असल्याने त्यांना किरकोळ

परवान्याची गरज नसल्याची बाब निदर्शनास येते. सबब, या सर्व साठामालकांचा जप्त करण्यात आलेला विविध अन्नधान्य/कडधान्यांचा संपुर्ण साठा त्यांना परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

मे. दिपक ट्रेडर्स, मे. वृषभ ट्रेडींग कंपनी, मे. वागड मार्केटींग, मे. वर्धमान ट्रेडींग कंपनी- वसई, मे. मंगलम ड्रायफ्रुट, मे. रमेश ट्रेडींग कंपनी, मे. मेघराज मार्केटींग, मे. शंकर ट्रेडींग कंपनी व मे. उपेटवाला ट्रेडींग कंपनी या घाऊक परवानाधारकांचा अन्नधान्य/कडधान्यांचा साठा जप्त असुन मे. दिपक ट्रेडींग कंपनी, मे. पायल एन्टरप्रायजेस, मे. पटेल ट्रेडींग कंपनी, मे. श्रीजी ट्रेडर्स- ठाणे, मे. मुरजी जेठाभाई ॲन्ड कंपनी, मे. मित्रेश मसाला या घाऊक परवानाधारकांचा अन्नधान्य/कडधान्याच्या साठयाव्यतिरीक्त जीवनावश्यक वस्तुंच्या यादीत समाविष्ट नसलेला अथवा अनुसुचित वस्तु नसलेला साठाही जप्त आहे. तसेच मे. अमृत ट्रेडींग कंपनी (अंबरनाथ), मे. प्रेमजी लालजी- सांताक्रुझ, मे. पालमपासु ॲन्ड कंपनी, मे. पोपटलाल प्रेमजी ॲन्ड कं., मे. शांती दाल मिल, मे. महालक्ष्मी प्रोव्हिजन, मे. के. किशोर ॲन्ड कं. व मे. पारस ग्रेन स्टोअर्स या किरकोळ परवानाधारकांचा अन्नधान्य/कडधान्याचा साठा जप्त असुन मे. अमित स्टोअर्स (कल्याण), मे. छेडा स्टोअर्स (माटूंगा), मे. डी आर कॉर्पोरेशन, मे. मेघ सन्स मालाड व मे. मिलन ब्रदर्स या किरकोळ परवानाधारकांचा अन्नधान्य/कडधान्याच्या साठयाव्यतिरीक्त जीवनावश्यक वस्तुंच्या यादीत समाविष्ट नसलेला अथवा अनुसुचित वस्तु नसलेला साठाही जप्त आहे. सदर परवानाधारकांनी सुनावणीच्यावेळी केलेल्या खुलाशात, त्यांनी मे. सावला फुड ॲन्ड कोल्ड स्टोअरेज या गोदामात साठवणुक केलेला अन्नधान्य/कडधान्याचा साठा जप्त असल्याचे सांगुन निवेदनासोबत नमुद साठामालकांनी सादर केलेले विविध परवाने तसेच साठ्याच्या खरेदी बिलांच्या छायांकीत प्रतींचे अवलोकन करता त्यांनी अन्नधान्य अथवा कडधान्याच्या व्यवसायाकरीता घाऊक/किरकोळ परवाना घेतला असुन सदर परवान्यांवर वेगळया गोदामांची नोंद निरंक असल्याचे दिसुन येते. सदर परवानाधारकांनी सादर केलेले निवेदन हे मोघम स्वरुपाचे असुन शासनाची दिशाभुल करणारे असुन त्यांनी धारण केलेल्या घाऊक अथवा किरकोळ अनुज्ञप्तीमधील अटीनुसार "अनुज्ञप्तीधारकाला नमुद केलेल्या ठिकाणाशिवाय इतर ठिकाणी त्याला अनुसुचित वस्तुंचा साठा ठेवण्याची इच्छा असल्यास त्याने त्याबाबत प्रत्यक्ष असे गोदाम कब्जात घेतल्यापासुन ४८ तासात कळविणे बंधनकारक आहे." सदर साठामालकांनी त्यांचा साठा मे. सावला फुड ॲन्ड कोल्ड स्टोअरेज या गोदामात साठवणूक केल्याबाबतचे सुचनापत्रही सादर न केल्याचे दिसुन येते. उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे तसेच संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी सादर केलेल्या परवानाधारकनिहाय परिपुर्ण अहवालात, सदर साठा मालकांनी नमुद वेअरहाऊसमध्ये साठवणुक केल्याबाबतचे सुचनापत्र त्यांच्या कार्यालयात सादर न केल्याबाबत नमुद आहे. सबब, उपरोक्त साठा मालकांनी साठेबाजीच्या उद्देशाने अवैध साठवणुक करुन स्थानिक बाजारपेठेत कृत्रिम टंचाई निर्माण करुन जीवनावश्यक वस्तुंच्या भाववाढीस प्रोत्साहन दिल्याचे सिध्द झाले आहे. सदर परवाना धारकांनी त्यांच्या परवान्यावरील नमुद पत्त्याव्यतिरीक्त अन्य ठिकाणी साठवणुक केल्याचे सुचनापत्र सादर केले

नाही अथवा परवान्यावर गोदामांची नोंद करुन न घेतल्याने त्यांनी त्यांना देण्यात आलेल्या परवान्यामधील तरतुदींचा व त्यामधील अटी/शर्तीचा तसेच पर्यायाने जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ चा भंग केल्याचे निष्पन्न झाल्याने या साठामालकांचा सदर गोदामात साठवणुक केलेल्या साठयापैकी अनुसुचित वस्तु नसलेला साठा वगळता उर्वरीत जप्त करण्यात आलेला अन्नधान्य/कडधान्य या अनुसुचित वस्तुंचा संपुर्ण साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

मे. लिलास फुड्स इंम्पेक्स प्रा.लि. या आयातदार कंपनीचा घाऊक व्यवसाय असुन त्यांचा कडधान्याचा साठा जप्त आहे. तसेच मे. हरी एन्टरप्रायजेस या घाऊक व्यापाऱ्याचा चवळी या अनुसुचित वस्तुचा व कुलथी या अनुसुचित वस्तुंच्या यादीत समाविष्ट नसलेला साठा जप्त आहे. सदरहु साठामालकांनी सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता, ते कडधान्य या अनुसुचित वस्तुंचा घाऊक व्यवसाय करीत असतांनाही त्यांनी अनुसुचित वस्तुंच्या खरेदी, साठवणुक व विक्रीकरीता आवश्यक असणारा घाऊक परवाना धारण केल्याचे दिसुन येत नाही. मे. मेघदुत सुपरमार्केट या घाऊक व्यापाऱ्यांचा कडधान्याचा साठा जप्त आहे. तथापी, मे. मेघदुत सुपरमार्केट या घाऊक व्यापाऱ्याने निवेदनासोबत जप्त साठयाचे खरेदी बिले तसेच घाऊक परवाना इ. पुरावादर्शक कागदपत्रेही सादर केले नाही. त्यामुळे जप्त असलेला साठा त्यांना परत मिळवण्यास कोणतेही स्वारस्य नसल्याचे दिसुन येते. सबब, मे. लिलास फुड्स इंम्पेक्स प्रा.लि., मे. हरी एन्टरप्रायजेस व मे. मेघदुत सुपरमार्केट या घाऊक व्यापाऱ्यांचा जप्त असलेला कडधान्याचा साठा हा विनापरवाना असल्याचे सिध्द होत असल्याने त्यांचा अनुसुचित वस्तुंच्या यादीत समाविष्ट नसलेला साठा वगळता उर्वरीत जप्त असलेला कडधान्याचा संपुर्ण साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

मे. अंकुर ड्रायफ्रुट, मे. महालक्ष्मी किराणा व मे. माय शॉप, अलिबाग या तिनही आस्थापना जिल्हा पुरवठा अधिकारी, रायगड यांच्या कार्यक्षेत्रातील आहेत. सदर साठामालकांकडे घाऊक अथवा किरकोळ परवाना आहे किंवा कसे ? याबाबतचा अहवाल संबंधित जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेतला असता, सदर किरकोळ व्यापाऱ्यांकडे अनुसुचित वस्तुंच्या व्यवसायासाठी आवश्यक असणारा किरकोळ परवाना नसल्याचे दिसुन येते. मे. अंकुर ड्रायफ्रुट यांचा नमूद गोदामात ४०.८० क्विंटल कडधान्याचा साठा जप्त असून तपासणीच्यावेळी त्यांच्या दुकानात २१.९४ क्विंटल कडधान्याचा साठा शिल्लक असल्याचे आढळून आले, असे मिळून एकूण ६२.७४ क्विंटल कडधान्याचा साठा त्यांनी एकत्रित साठवणूक केल्याचे आढळून आले. मे. महालक्ष्मी किराणा यांचा नमूद गोदामात ४१.१० क्विंटल कडधान्याचा साठा जप्त असून तपासणीच्यावेळी त्यांच्या दुकानात ३२.३० क्विंटल कडधान्यांचा साठा शिल्लक असल्याचे आढळून आले, असे मिळून एकूण ७३.४० क्विंटल कडधान्याचा साठा त्यांनी एकत्रित साठवणूक केल्याचे आढळून आले. तसेच मे. माय शॉप, अलिबाग यांचा नमूद गोदामात ४५ क्विंटल कडधान्याचा साठा जप्त असून तपासणीच्यावेळी त्यांच्या दुकानात ४३.९० क्विंटल कडधान्याचा साठा

शिल्लक असल्याचे आढळून आले, असे मिळून एकूण ८८.९० क्विंटल कडधान्याचा साठा त्यांनी एकत्रित साठवणूक केल्याचे आढळून आले. सदर साठा मालकांचा मे. सावला फुड ॲन्ड कोल्ड स्टोअरेज या गोदामातील जप्त कडधान्याचा साठा तसेच जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या अहवालानुसार नमुद साठामालकांच्या व्यवसायाच्या ठिकाणी साठवणुक केलेला साठा हा एकत्रीत बेरीज करता त्यांनी किरकोळ परवाना धारण करण्याकरीता ५० क्विंटल या विहीत परिमाणापेक्षा अधिक साठवणुक केल्याचे सिध्द होत असल्याने त्यांनी सदर व्यवसायासाठी किरकोळ परवाना धारण करणे बंधनकारक आहे. तसेच मे. चेतना ड्रायफ्रुट ॲन्ड सन्स या किरकोळ व्यापाऱ्याचा नमूद गोदामात ५७.५० क्विंटल मुग या कडधान्याचा साठा जप्त असुन सदर व्यापाऱ्याने सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन करता त्यांनी अनुसुचित वस्तुच्या व्यवसायासाठी आवश्यक असणारा किरकोळ परवाना धारण केला नसल्याचे दिसुन येते. दि महाराष्ट्र अनुसुचित वस्तू किरकोळ व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९७९ अन्वये अनुसुचित वस्तूंचा व्यापार करणाऱ्या किरकोळ व्यापाऱ्यांना किरकोळ परवाना घेणे आवश्यक आहे. सदर आदेशान्वये डाळी/कडधान्य या अनुसुचित वस्तूंचे किरकोळ व्यापारी हे विविध प्रकारच्या डाळी/कडधान्य विक्रीकरिता एकत्रितरित्या ५० क्विंटल पेक्षा जास्त साठवणूक करीत असल्यास त्यांना किरकोळ परवाना घेणे आवश्यक आहे. तथापी, सदर चारही किरकोळ व्यापाऱ्यांकडे किरकोळ परवाना नसल्याने त्यांचा जप्त असलेला साठा हा विनापरवाना असल्याचे सकृतदर्शनी दिसुन येते. सबब, मे. अंकुर ड्रायफ्रुट, मे. महालक्ष्मी किराणा, मे. माय शॉप, अलिबाग व मे. चेतना ड्रायफ्रुट ॲन्ड सन्स या किरकोळ व्यापाऱ्यांचा जप्त असलेला विविध कडधान्याचा साठा हा विनापरवाना असल्याचे सिध्द होत असल्याने त्यांचा अनुसुचित वस्तुंच्या यादीत समाविष्ट नसलेला साठा वगळता उर्वरीत जप्त असलेला विविध कडधान्याचा संपुर्ण साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

मे. विक्रम ट्रेडींग, मे. वागड मार्केटींग, मे. अतुल ट्रेडर्स व श्री एन्टरप्रायजेस या साठा मालकांचा अन्नधान्य/कडधान्याचा साठा हा या विभागामार्फत यापूर्वी करण्यात आलेल्या कार्यवाहीमध्ये जप्त असुन सदरचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याबाबतची माहिती मे. सावला फुड्स ॲन्ड कोल्ड स्टोअरेज प्रा. लि. यांच्या वतीने सुनावणीच्या वेळी उपस्थित प्रतिनिधी यांनी सांगितले आहे. सदर प्रकरणी तपासणीच्या वेळी मे. सावला फुड्स ॲन्ड कोल्ड स्टोअरेज प्रा. लि. यांच्या वतीने पथकास निदर्शनास आणुन देणे अपेक्षीत होते. त्यामुळे सदरहु जप्त असलेल्या साठयाबाबत भाष्य करणे उचित नसल्याची या कार्यालयाची धारणा आहे. सबब, उपरोक्त चारही साठामालकांचा यापूर्वीच जप्त असलेल्या साठयाबाबत मा. न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये जप्त/सिल करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात पुढील आदेश देत आहे.



CONTROLLER OF RATIONING ... MUMBAI

**आदेश :-**

१) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. जशोदा एन्टरप्रायजेस, मे. जय ट्रेडींग कंपनी व मे. शैलेशकुमार ॲन्ड कंपनी यांचा कडधान्याचा संपुर्ण साठा त्यांना परत करण्यात यावा.

२) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. अनमोल एन्टरप्रायजेस, मे. भगवती एन्टरप्रायजेस, मे. हर्षिता एन्टरप्रायजेस- विरार, मे. लिलाधर भगवानदास, मे. परेश ट्रेडींग- पनवेल, मे. सहकार जनरल स्टोअर्स- बोळींज, मे. अरविंद स्टोअर्स, मे. बहुचारीज ट्रेडींग कंपनी, मे. छेडा दालमिल, मे. छेडा मार्केटींग, मे. डी. पी. मेवावाला, मे. हंसराज भारमल- परेल, मे. इंदरमल फतेचंद, मे. कल्याणजी देराज ॲन्ड कंपनी, मे. लखमशी नागशी ॲन्ड कं. -परेल, मे. महावीर ट्रडींग, मे. मनीषा ट्रेडींग, मे. नंदकिशोर मगनलाल ॲन्ड कं., मे. नानुमल जेसुमल, मे. नवनीत स्टोअर्स- परेल, मे. न्यु पटेल ट्रेडर्स, मे. पुजा ट्रेडींग कंपनी- गोरेगांव, मे. रमनलाल विठ्ठलदास ॲन्ड कं., मे. राजेश जनरल स्टोअर्स, मे. सफल ट्रेडर्स, मे. श्रीचामुंडेश्वरी ट्रेडर्स, मे. सत्यनारायण प्रोव्हीजन स्टोअर्स, मे. विकमणी ब्रदर्स, मे. वेराई मसाला व मे. विपुल ट्रेडींग कंपनी यांचा अन्नधान्य/कडधान्यांचा संपुर्ण साठा त्यांना परत करण्यात यावा.

३) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. दिपक ट्रेडर्स, मे. वृषभ ट्रेडींग कंपनी, मे. वागड मार्केटींग, मे. वर्धमान ट्रेडींग कंपनी- वसई, मे. मंगलम ड्रायफ्रुट, मे. रमेश ट्रेडींग कंपनी, मे. मेघराज मार्केटींग, मे. शंकर ट्रेडींग कंपनी व मे. उपेटवाला ट्रेडींग कंपनी या घाऊक परवानाधारकांचा अन्नधान्य/कडधान्यांचा संपूर्ण साठा तसेच मे. अमृत ट्रेडींग कंपनी (अंबरनाथ), मे. प्रेमजी लालजी- सांताक्रुझ, मे. पालमपासु ॲन्ड कंपनी, मे. पोपटलाल प्रेमजी ॲन्ड कं., मे. शांती दाल मिल, मे. महालक्ष्मी प्रोव्हिजन, मे. के. किशोर ॲन्ड कं. व मे. पारस ग्रेन स्टोअर्स या किरकोळ परवानाधारकांचा अन्नधान्य/कडधान्यांचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

४) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. दिपक ट्रेडींग कंपनी यांचा चवळी, मे. पायल एन्टरप्रायजेस यांचा चणा, मे. पटेल ट्रेडींग कंपनी यांचा चवळी, मे. श्रीजी ट्रेडर्स- ठाणे यांचा मसुर, मे. मुरजी जेठाभाई ॲन्ड कंपनी यांचा चणा, मुग, चवळी व मसुर, मे. मित्रेश मसाला यांचा मुग व चवळी, मे. अमित स्टोअर्स (कल्याण) यांचा मुग, मे. छेडा स्टोअर्स (माटूंगा) यांचा तांदूळ, चणा, चवळी, मुग व मुगडाळ, मे. डी आर कॉर्पोरेशन यांचा मुग, मे. मेघ सन्स मालाड यांचा तांदूळ व मे. मिलन ब्रदर्स यांचा चवळी, चणा व वाटाणा या कडधान्यांचा संपूर्ण साठा जप्त करण्यात यावा.

५) उपरोक्त अनुक्रमांक ४ मधील नमूद साठा मालकांचा उर्वरीत जप्त असलेला साठा हा अनुसुचित वस्तूंच्या यादीत समाविष्ट नसलेला साठा त्यांना परत करण्यात यावा.

0020

६) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. लिलास फुड्स इम्पेक्स प्रा.लि. यांचा चणा व चवळी, मे. हरी एन्टरप्रायजेस यांचा चवळी व मे. मेघदुत सुपरमार्केट यांचा चवळी व चणा या कडधान्यांचा संपूर्ण साठा जप्त करण्यात यावा.

७) उपरोक्त अनुक्रमांक ६ मधील नमूद साठा मालकांपैकी मे. हरी एन्टरप्रायजेस यांचा कुलथीचा साठा हा अनुसुचित वस्तूंच्या यादीत समाविष्ट नसल्याने त्यांना परत करण्यात यावा.

८) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. अंकुर ड्रायफ्रुट यांचा चवळी, चणा व मुग, मे. महालक्ष्मी किराणा यांचा चवळी, मे. माय शॉप अलिबाग यांचा चवळी व मे. चेतना ड्रायफ्रुट ॲन्ड सन्स यांचा मुग या कडधान्यांचा संपूर्ण साठा जप्त करण्यात यावा.

९) उपरोक्त अनुक्रमांक ८ मधील नमूद साठा मालकांपैकी मे. अंकुर ड्रायफ्रुट व मे. महालक्ष्मी किराणा यांचा वालचा साठा हा अनुसुचित वस्तूंच्या यादीत समाविष्ट नसल्याने त्यांना परत करण्यात यावा.

१०) सदर शासनजमा करण्यात आलेला संपूर्ण साठा उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी वैध परवानाधारकास प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावून येणारी रक्कम उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) मे. सावला फुड्स ॲन्ड कोल्ड स्टोअरेज प्रा. लि. चे मालक/भागीदार
२) मे. जशोदा एन्टरप्रायजेस
३) मे. जय ट्रेडींग कंपनी
४) मे. शैलेशकुमार ॲन्ड कंपनी
५) मे. अनमोल एन्टरप्रायजेस
६) मे. भगवती एन्टरप्रायजेस
७) मे. हर्षिता एन्टरप्रायजेस- विरार
८) मे. लिलाधर भगवानदास
९) मे. परेश ट्रेडींग- पनवेल

१०) मे. सहकार जनरल स्टोअर्स- बोळींज
११) मे. अरविंद स्टोअर्स
१२) मे. बहुचारीज ट्रेडींग कंपनी
१३) मे. छेडा दालमिल
१४) मे. छेडा मार्केटींग
१५) मे. डी. पी. मेवावाला
१६) मे. हंसराज भारमल- परेल
१७) मे. इंदरमल फतेचंद
१८) मे. कल्याणजी देराज ॲन्ड कंपनी
१९) मे. लखमशी नागशी ॲन्ड कं. -परेल
२०) मे. महावीर ट्रेडींग
२१) मे. मनीषा ट्रेडींग
२२) मे. नंदकिशोर मगनलाल ॲन्ड कं.
२३) मे. नानुमल जेसुमल
२४) मे. नवनीत स्टोअर्स- परेल
२५) मे. न्यु पटेल ट्रेडर्स
२६) मे. पुजा ट्रेडींग कंपनी- गोरेगांव
२७) मे. रमनलाल विठ्ठलदास ॲन्ड कं.
२८) मे. राजेश जनरल स्टोअर्स
२९) मे. सफल ट्रेडर्स
३०) मे. श्रीचामुंडेश्वरी ट्रेडर्स
३१) मे. सत्यनारायण प्रोव्हीजन स्टोअर्स
३२) मे. विकमणी ब्रदर्स
३३) मे. वेराई मसाला
३४) मे. विपुल ट्रेडींग कंपनी
३५) मे. दिपक ट्रेडर्स
३६) मे. वृषभ ट्रेडींग कंपनी
३७) मे. वागड मार्केटींग
३८) मे. वर्धमान ट्रेडींग कंपनी- वसई
३९) मे. मंगलम ड्रायफ्रुट
४०) मे. रमेश ट्रेडींग कंपनी
४१) मे. मेघराज मार्केटींग
४२) मे. शंकर ट्रेडींग कंपनी
४३) मे. उपेटवाला ट्रेडींग कंपनी
४४) मे. अमृत ट्रेडींग कंपनी (अंबरनाथ)
४५) मे. प्रेमजी लालजी- सांताक्रुझ
४६) मे. पालमपासु ॲन्ड कंपनी
४७) मे. पोपटलाल प्रेमजी ॲन्ड कं.

४८) मे. शांती दाल मिल
४९) मे. महालक्ष्मी प्रोव्हिजन
५०) मे. के. किशोर ॲन्ड कं.
५१) मे. पारस ग्रेन स्टोअर्स
५२) मे. दिपक ट्रेडींग कंपनी
५३) मे. पायल एन्टरप्रायजेस
५४) मे. पटेल ट्रेडींग कंपनी
५५) मे. श्रीजी ट्रेडर्स- ठाणे
५६) मे. मुरजी जेठाभाई ॲन्ड कंपनी
५७) मे. मित्रेश मसाला
५८) मे. अमित स्टोअर्स (कल्याण)
५९) मे. छेडा स्टोअर्स (माटूंगा)
६०) मे. डी आर कॉर्पोरेशन
६१) मे. मेघ सन्स मालाड
६२) मे. मिलन ब्रदर्स
६३) मे. लिलास फुड्स इंम्पेक्स प्रा.लि.
६४) मे. हरी एन्टरप्रायजेस
६५) मे. मेघदुत सुपरमार्केट
६६) मे. अंकुर ड्रायफ्रुट
६७) मे. महालक्ष्मी किराणा
६८) मे. माय शॉप अलिबाग
६९) मे. चेतना ड्रायफ्रुट ॲन्ड सन्स

(मे. सावला फुड्स ॲन्ड कोल्ड स्टोअरेज प्रा. लि. यांचे मार्फत)

**प्रत,**

१) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.

२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.

३) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव.

४) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.